CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

पर्यटन

डिसेंबर १९७५ □ शृंगेरी विशेषांक □ मूल्य दोन रुपये



Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri



पर्यटन

वर्ष दुसरे : अंक चौथा

शृंगेरी विशेषांक

डिसेंबर १९७५

मूल्य चार रुपये

वार्षिक वर्गणी वीस रूपये □ कोणत्याही अंकापासून वर्गणीदार होता येते

अनुक्रम

- भारतातील आद्यधर्मपीठ शृंगेरी :
  —पं. वसंतराव गाडगीळ पृ. ७ ते १३ छायाचित्रांसह
- रत्नागिरी जिल्ह्यातील पर्यटन केन्द्रांचा विकास :
  -प्र. के. घाणेकर पृष्ठ १४ ते १५
- पेठचा किल्ला ऊर्फ कोतळी गड :
  —प्र. के. घाणेकर पृष्ठ १६ ते १९ छायाचित्रांसह
- प्रवास हा सुखाचा :
  पृष्ठ २० ते २३
- वृत्तविशेष :
  पृष्ठ २३
- उरण व करंजा :
  रमेश द. पाटील पृष्ठ २४ ते २६

मालक, मुद्रक, संपादक : जयंत जोशी

सहसंपादिका : सौ. मीना जोशी

मुद्रणस्थळ : प्रमोद प्रिंटर्स,
१०१९, सदाशिव पेठ, पुणे ३०.

हे पत्र श्री. जयंत वासुदेव जोशी यांनी मे. प्रमोद प्रिंटर्स, १०१९, सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून त्यांनीच दीपा पब्लिकेशन्स ७९७ (नवा) सदाशिव पेठ, पुणे ३०. येथे प्रसिद्ध केले.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

संपादकीय

दीपावली अंकानंतर वास्तविक बहुतेक सर्व मासिके एक महिना सुटी घेतात. परंतु 'पर्यटन' ला अशी विश्रांती नाही ! पृष्ठसंख्या मात्र कमी केली आहे.

परंतु हा अंक सजला आहे भारतातील आद्य धर्मपीठ 'शृंगेरी' वरील खास सचित्र माहितीने ! निसर्गाचं उदार वरदान लाभलेला हा परिसर आपणास आमंत्रण देत आहे, अगदी राहण्याजेवण्यासह ! फक्त प्रवास करून जाण्याचे काम आपले !

धार्मिक अधिष्ठान लाभलेले हे रम्य स्थळ कित्येक धर्मनिष्ठांनीही पाहिलेले नसेल. तिथे गेल्याने " चरन् वै मधु विन्दति–जो फिरतो त्याला मध मिळतो " या उक्तीची प्रचीती येईल.

या अंकाचे निमित्ताने आपण ह्या प्रवासाचे प्रस्थान ठेवावे, हेच त्याचे सार्थक होईल !

जयंत जोशी

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

भारतातील आद्य धर्मपीठ शृंगेरी

शृंगेरी शारदापीठाचे महाराष्ट्रातील प्रतिनिधी पं. वसंतराव गाडगीळ यांनी या पवित्र तपःस्थलीचा करून दिलेला परिचय.

अलौकिक जगद्गुरु

उत्तर भारताने जगाला राम, कृष्ण बुद्ध हे अवतार दिले आणि या अवतारांचे साफल्य दक्षिणेतील श्रीमत् शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य या थोर आचार्यपरंपरेने आपल्या अलौकिक जीवनकार्याने साधून भारताची एकात्मता अभंग राखली हा इतिआस आहे. या सर्व धर्म संप्रदायांत जगद्गुरू यासारखी मानाची विरुदावली यथार्थतेने मिळाली ती आद्य शंकराचार्यांना. दक्षिणेत कालडी (केरळ) या पूर्णातीरेवरील पवित्र परिसरांत जन्म आणि केदारनाथ येथे हिमधवल गिरिशिखरांच्या कुशीत गुहाप्रवेशाने लौकिक जीवनाचा शेवट. साऱ्या ३२ वर्षांच्या अल्पायुषी जीवनकालात अनेक सम्राटांना शतकात, सहस्त्रांत गाजवता येणार नाही असा विक्रम करून 'आद्य शंकराचार्य' हे नाव आध्यात्मिक जगतात, भारतवर्षाच्या राष्ट्रजीवनात अढळ ध्रुवपद मिळवून बसले आहे. शृंगेरी, द्वारका, जगन्नाथपुरी आणि ज्योतिर्मठ (बद्रिनाथ येथे आजही त्यांनी सुदृढ रोवलेले धर्मध्वज दिमाखाने फडफडत आहेत. भारताचे भा(विद्या)–रत हे नाव विद्याधर्माची परंपरा अखंड राखून सार्थ करीत आहेत. भारतावर कालचक्राची आवर्तने चालू असतानादेखील धर्मात्मा भारतातील अध्यात्म धर्माचा नन्दादीप आज हजारो वर्षे अन्तर्बाह्य आक्रमणांच्या फडफडाटातही शांतपणे तेवत आहे, याचे श्रेय भारताच्या चार दिशांना असणाऱ्या या चार धर्मपीठांना द्यावे लागेल.

धर्मपीठ शृंगेरी

आचार्यांच्या चार धर्मपीठांपैकी शृंगेरी हे धर्मपीठ केवळ कालानुक्रमाने, अधिकाराने, विद्यावंशसमृद्धीने आणि धर्मानुष्ठानाच्या तेजस्वितेनेच केवळ सर्वप्रथम आहे असे नाही तर या सर्वांना तेथील निसर्गरमणीयतेची, प्राकृतिक सौंदर्याची, प्रसन्नशीतल पावित्र्याची जोड मिळाल्यामुळे भारतीय आणि विदेशी पर्यटकांनी पाहिलेच पाहिजे असे ते एक सर्वोत्कृष्ट पर्यटनकेन्द्र म्हणूनही आधुनिक तन्त्राची जोड दिली तर विकसित होण्यासारखे आहे.

अतिप्राचीन परंपरा

शृंगेरीला नावापासूनच अगदी थेट रामायणापासूनची अतिप्राचीन ऐतिहासिक परंपरा आहे. राजा रोमपादाच्या कालखंडात देशात सतत १२ वर्षे पडलेला दुष्काळ नाहीसा करण्यासाठी खास निमंत्रणावरून महर्षी ऋष्यशृंग यांनी कठोर तपःसाधना करून दुष्काळाच्या आपत्तीचे निराकरण केले. या मागोमाग अयोध्यानगरीचा निपुत्रिक राजा दशरथ याने पुत्रप्राप्तीसाठी इतर सर्व उपाय हरल्यानंतर पुत्रकामेष्टी यज्ञाचे खास अनुष्ठान करविले ते महर्षी ऋष्यशृंगांनाच अयोध्या राजधानीत बोलावून. हे ऋष्यशृंगमुनी आणि त्यांचे वडील विभाण्डक महर्षी हे दोघेही ऋतंभरा प्रज्ञेच्या क्रान्तदर्शी ऋषिपरंपरेच्या भारताच्या तेजस्वी मालिकेतील दोन दीपस्तंभच मानावे लागतील अशा थोर योग्यतेचे होते. कठोर तपस्या हेच यांचे जीवित, परोपकार हेच जीवनसाफल्य. या विभाण्डक आणि ऋष्यशृंग नावाच्या पितापुत्र महर्षींची पावन तपःस्थली म्हणजेच आजची शृंगेरी.

सह्यपर्वताच्या दक्षिणोत्तर शिखरमालिकेत कर्णाटक भागातील तुंगा नदीच्या उगमाची अजोड जोड लाभलेला ऋष्यशृंग हा पहाड पर्वतभाग म्हणजे ऋष्यशृंगांचे चिरंतन स्मारक. प्रसन्न सलिला भगवती तुंगानदी बाल्यसुलभ

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अवखळपणाने खळाळत खाली उतरते ती पंढरपूरच्या चंद्रभागेप्रमाणेच पायथ्याच्या छोट्या पठारावर चंद्रकोरीचे वळण घेऊन थोडी स्थिरावते, अंमळ विसावते ती याच शृंगगिरी, शृंगेरी क्षेत्रात. भगवती शारदाम्बा येथे अखण्ड विराजमान असल्यामुळे तिच्या पदकमलातळी थोडा तरी विश्राम घेऊन सरित्पतीकडे पुढे झेपावण्यासाठी. ऋष्यशृंगगिरीच्या शिखरावलीच्या कोंदणांत अमृतधारा पयस्विनी तुंगा नदीच्या प्रशांत प्रसन्न तीरावर विसावलेली, वसलेली शृंगेरी म्हणून अंगठीतल्या हिऱ्यासारखी वाटते. मनोज्ञ रम्य, मधुर आणि प्रसन्न, प्रशांत.

शारदापीठाची स्थापना

आद्य शंकराचार्य धर्मध्वजा हाती घेऊन भारताच्या परिक्रमेला निघाले ते सर्वप्रथम येथे आले. या तुंगा तीरावर एक मण्डूकी (बेडकी) चण्ड आतपांनी (प्रखर सूर्यकिरणांनी) व्याकूळ झाली असताना एक सर्पराज तिच्यावर आपला डौलदार फणा डुलवीत तिला शीतल छाया छत्र देत आहेत, असे अलौकिक दृश्य त्यांना पहायला मिळाले. ते क्षणभर थबकले. अहिनकुल वैरच जिथे संपुष्टात आले ती ही निर्वैर तपःस्थली धर्मपीठ प्रस्थापनेला सर्वथैव योग्य असा दृकप्रत्यय आल्यामुळे त्यांनी या तपोभूमीत भारतातील सर्वप्रथम धर्मपीठाची शृंगेरी शारदापीठाची प्रतिष्ठा केली.

आपल्या दिग्विजयी धर्मयात्रेत मंडनमिश्रांना आचार्यांनी जिंकले त्यावेळी मध्यस्थ न्यायाधीश असणारी आणि निष्पक्ष न्यायदान करून स्वतःचा पति पराभूत आणि आचार्य अजिंक्य असा निर्णय देऊन भारतीय न्यायासनाची मान जगाच्या पाठीवर सदैव ताठ ठेवणारी मंडनमिश्रांची पत्नी श्री सरस्वती ही प्रत्यक्ष 'विद्याधिदेवता शारदाम्बा भगवती' असा साक्षात्कार होताच आचार्यांनी तिलाच या ठिकाणी सुप्रतिष्ठित केले. तंत्र संप्रदायाच्या उपासनापरंपरेत अतिशय महत्त्वाचे मानले गेलेले 'श्रीचक्र' आचार्यांनी येथे सुप्रतिष्ठित केले आणि त्यावर भगवती शारदाम्बा चंदनकाष्ठ-प्रतिमा स्वरूपात स्थापन केली. या देवतेमुळेच हे सर्वाद्य धर्मपीठ 'शारदापीठ' या नावाने ओळखले जाते.

धर्माचार्य

आचार्यांचे शिष्योत्तम मण्डनमिश्र यांनाच दीक्षा देऊन सुरेश्वराचार्य या नावानं आचार्यांनी या शृंगेरीपीठावर त्यांची नियुक्ती केली. तेव्हापासून गेली अखंड १२०० वर्षे या धर्मपीठाची विद्यावंशपरंपरा 'सततम् ऊर्ध्वम्'-चढत्या श्रेणीने जिवंत जागृत ठेवणारे एकूण ३५ धर्माचार्य, हा या पीठाचा तेजस्वी इतिहास आहे. सध्याचे ज्येष्ठ जगद्गुरू श्रीमद् अभिनव विद्यातीर्थ महाराज हे या परंपरेत ३५ वे असून या दीपावलीच्या मंगल महोत्सवांत ते ५९ वर्षांचे झाले. बालवयापासून आपल्या सक्त नजरेखाली लालन-पालन-अध्यापन-अनुष्ठान करून घेतलेली एक ब्रह्मचारी विद्याविनयसंपन्न तरुण तेजोमूर्ती आचार्यांनी आपले उत्तराधिकारी म्हणून गेल्या दिवाळीत दीक्षित केली असून त्यांचे आता पीठाधिकार परंपरेतील (क्र.३६) नाव आहे जगद्गुरू शंकराचार्य श्रीभारतीतीर्थ स्वामीमहाराज. या गुरुशिष्यांचा या दीपावलीपासून संचाराला प्रारंभ झाला असून त्यांच्याच उपस्थितीत 'शारदा' संस्कृत पाक्षिकाचा १७ वा वार्षिकोत्सव बंगलोर येथे झाला आहे.

शृंगेरी येथे लहानमोठी ३०-४० देवालये असली तरी उपासनापरंपरेतील मूर्धन्य श्रीशारदाम्बा आणि शिल्पसौंदर्याचा अनुपम आदर्श असणारे विद्याशंकर मंदिर यांचा उल्लेख आवर्जून केला पाहिजे.

तुंगातीरावरील श्रीशारदाम्बा मंदिर कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिरासारखेच भव्य, परंतु आतील आवार प्रशस्त, रेखीव, स्वच्छ, प्रकाशमान असल्यामुळे हजारो भक्त देवीचे दर्शन अगदी जवळून स्वस्थपणे विनासायास घेऊ शकतात. शिवलिंगावर उडया मारणाऱ्या एका उंदरामुळे स्वामी दयानंद सरस्वती यांचा चित्तक्षोभ होऊन त्यांचा मूर्तिपूजेवरील विश्वास साफ उडाला आणि १०० वर्षांपूर्वी आर्यसमाज जन्माला आला. कोल्हापूर येथेही एकदा देवीच्या गाभाऱ्यात देवीच्या शरीरावर उंदीर आणि झुरळे फिरताना पाहून माझ्या माझ्या मित्राने मला तिथेच स्वामी दयानंदांच्या त्या सत्यकथेचे आणि सत्यार्थप्रकाशाचे स्मरण करून दिले.

समृद्ध शारदाम्बा मंदिर

शारदाम्बेच्या मंदिरातील परिसर स्वच्छतेबाबत कमालीची दक्षता घेतल्यामुळे नित्य शुचि, पवित्र, प्रसन्न वाटतो. इतर सर्वच देवस्थानांनी हा आदर्श मानण्यासारखा आहे. आद्य शंकराचार्यांनी सर्वप्रथम बसविलेल्या चंदनी काष्ठप्रतिमेच्या जागेवर विद्यारण्यांनी काश्मीरातून आणवून प्रतिष्ठापित केलेली सुमारे ६०० वर्षांची जुनी प्राचीन कृष्णपाषाण प्रतिमा मूलविग्रह म्हणून आज शृंगेरीच्या शारदाम्बा मंदिरात आहे. तिच्यावर संपूर्ण सुवर्णाचं आव-

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

रण असून हिरे—माणके इ. सर्व रत्नांचे [illegible] मूल्याचे दागदागिने घातलेली पूर्ण सुशोभित मूर्ती शारदीय नवरात्रोत्सवांत पाहिली की डोळ्यांचे पारणेच फिटावे. अलिकडेच एका भक्ताने स्वतः एकट्याने सहस्त्र सुवर्ण-मुद्रांचा हार देवीला अर्पण केलेला असून त्याची किंमत सहज पाच लाखांच्या घरात जाईल. या प्रत्येक मुद्रेवर ललितासहस्रनाम कोरलेले आहे.

मैसूरचे दिवंगत महाराज श्री जयचामराज वाडियार आणि गोमंतकाचे मुख्यमंत्री कै. श्री. दयानंद बांदोडकर या दोन आचार्यभक्तांनी चांदीचा दरवाजा, आपण पाण्यात पाऊल टाकतो आहोत असा भास व्हावा अशी मयसभेचे दर्शन घडविणारी आरशासारखी फरशी इत्यादीमुळे या शारदाम्बा मंदिराचे वैभव अगणित पटीनी वाढविले आहे.

कुंकुमार्चन

या देवीसमोर-देवीवर नव्हे—अभिषेक होतो तो केवळ कुंकुमाभिषेक-कुंकुमार्चन आणि तो होतो श्री चक्रावर. कोणीही किमान दोन रुपये देऊन अष्टोत्तरशत, तीन रुपये देऊन त्रिशती आणि रुपये दहा देऊन सहस्रनाम आपले नाव जन्मनक्षत्र सांगून स्वतःच्या डोळ्यांसमोर श्रीचक्रावर श्रीशारदाम्बेच्या चरणकमलाशी चालू असलेलेस्वतःचे हे कुंकुमार्चन पद्मासनस्थ होऊन पाहू शकतो, कुंकुम—शर्करा प्रसाद घेऊ शकतो.

कलात्मक विद्याशंकर मंदिर

केवळ शृंगेरीतच नव्हे तर भारतात शिल्पसौन्दर्याच्या दृष्टीने अप्रतिम असणारे, प्रत्येकाने किमान तीनचार तास खर्चून पाहिलेच पाहिजे असे मंदिर म्हणजे विद्याशंकर मंदिर. शृंगेरी पीठावरील दहावे पीठाचार्य श्रीविद्याशंकर भारती यांचे हे मंदिर. या मंदिरात असलेले प्रचंड सिंह-स्तम्भ आणि त्या प्रत्येकावर असणाऱ्या बारा राशींच्या देवतांसह प्रतिमा हे येथील आगळे वैशिष्ट्यच सूर्य ज्या राशीत असेल त्या राशीच्या स्तंभावर त्याचे किरण पूर्व, पश्चिम किंवा दक्षिण द्वारातून पडलेले पहायला मिळतात.

पाश्चिमात्य विद्येच्या प्रभावाने आंग्लशूद्र झालेल्या भारतातील किती इंजिनिअरिंग कॉलेजांतील तथाकथित विद्वानांनी स्थापत्यशास्त्रातील प्राचीन भारताच्या या गरुडझेपेचा मूलस्त्रोत पाहण्याची उत्सुकता दाखवली आहे ? किती इंजिनिअर्स आज अशा रचना त्यांच्या प्रगत (?) विज्ञानाने साकार करू शकतात ?

या विद्याशंकर मंदिराच्या बाजूनेच खळाळते प्रसन्न-सलिला तुंगा. तिच्या काठचा तो सुंदर रेखीव घाट, याच घाटावरील ते सर्पमण्डूकीच्या निर्वैर स्नेहाचे दर्शन घडविणारे छोटे मंदिर आणि 'अभय' असल्यामुळे आपल्या पायाशी लडिवाळ लोळण घेणारे लहानमोठ्या आकाराचे जसे छोटे तसेच विशालकाय असणारे ते निळेभोर मासे.

याच घाटावर आलेल्या छोट्या नावेत बसा आणि चला पलीकडे तुंगेच्या दक्षिणतीरावर असलेल्या नृसिंह-वनांत.

आचार्यांचे निवासानुष्ठान स्थान

कल्पवृक्ष (माड), पूगी (पोफळ), रम्भा (केळी) याच्या हरितरम्य वनराजीने डुलणाऱ्या या निसर्गसौंदर्याच्या कोंदणात आहेत पूर्वाचार्यांची दोन समाधी मंदिरे आणि आचार्यांचे निवासानुष्ठान स्थान. याच ठिकाणी आचार्यांचा नित्य आन्हिकाचा, अनुष्ठान, उपासना, तपस्येचा कार्यक्रम चालू असतो. विभाण्डक महर्षींपासून पूजनात असलेले श्रीचंद्रमौलीश्वराचे स्फटिक शिवलिंग आणि विशालु उदरात रत्नभाण्डार असणारा रत्नगर्भ गणपती, शारदाम्बेची आणि भगवत्पूज्यपाद आद्य शंकराचार्यांची चल प्रतिमा हे सारे या नृसींहवनातील आचार्यश्रींच्या देवतागारात आहे. 'श्री' स्वतः रोज रात्री सर्वांच्या उपस्थितीत पवित्र वेदमन्त्रघोषात या देवतांचे सांगोपांग पूजन करतात. ते आपण तास दोन तास (रात्री ८-३० ते १०-३०) समोर बसून स्वस्थपणे पाहू शकतो. सकाळी ९ ते ११ 'श्री' या ठिकाणी सर्वांना भेटतात. रजतपात्रातील केशरयुक्त तीर्थ पळीएवढ्या लांबीच्या रजत चमच्याने सर्वांना स्वतः देतात. मात्र एक मर्यादा सर्वांनाच पाळावी लागते. अंगावर, अंगात सदरा, गंजीफ्रॉक यासारखे कोणतेही वस्त्र न घालता स्नान करून पीतांबर, धोतर यासारखे धूतवस्त्र धारण करूनच सर्वांना अतिशय विनयनम्र होऊन येथे जावे लागते. विद्याधिदेवतेच्या साम्राज्य सिंहासनासमोर विनम्र होऊनच त्या विद्येला, तेजस्वितेला, सिद्धीला आपण आपली करू शकतो, ही श्रद्धा या सर्वांचे मूळ आहे.

वाक्यार्थ महासभा

प्रत्येक वर्षी गणेशचतुर्थी ते प्रौष्ठपदी (भाद्र) पूर्णिमा असे बारा दिवस येथे विद्यामहासभा भरते. न्याय, व्याकरण मीमांसा, वेदान्त या शास्त्रांचे दिग्गज पंडित यासाठी मुद्दाम निमंत्रून त्यांचे वादविवाद—शास्त्रार्थ—वाक्यार्थ

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

त्या त्या शास्त्रावर होतात. शेवटच्या [illegible] दिवशी (संन्यासी–) चातुर्मास्य समाप्ति. या दिवशी या वाक्यार्थ-महासभेचा समारोप होतो. विद्वान शास्त्रीपंडितांना भरजरी महावस्त्र, दक्षिणा संभावना देऊन त्यांच्या विद्या-व्रताची कदर केली जाते. भारत सरकारचे शिक्षामंत्रालय यासाठी अलीकडे खास अनुदानही देते.भारतात वाराणसी-खेरीज असा सोहळा अन्यत्र पहायला मिळत नाही. शृंगेरीने गणेशोत्सव महाराष्ट्राकडून घेतला असून विद्यापूजनाने तो गेली ८० वर्षे अखंड चालू आहे.

नवरात्रीचा दरबार

नवरात्रीचा दरबार हे शृंगेरीचे संपूर्ण भारताला असणारे एक जबरदस्त आकर्षण आहे. हे दहा दिवस शृंगेरी तेजाने नुसती लखलखून गेलेली असते. रात्रीचा दरबार, रोजची देवीची बदलती वाहने, भरजरी पोषाख, सुवर्णाचा रत्नकिरीट धारण करून व्याख्यान–सिंहासनावर राज-वैभवाने तळपत बसलेले विद्याविश्वसम्राट धर्माचार्य 'श्री' कलाकारांच्या अहमहमिकेने झटत असलेल्या सेवा, यागांची अनुष्ठाने, अन्नसंतर्पण, सर्व सर्व काही धर्मविद्या. कलामय. भारताच्या प्राचीन सुवर्णयुगात खेचून नेणारे, जावे तर परत यावेसेच वाटू नये.

वैशाख महिन्यात आद्यशंकराचार्यांच्या जयन्त्युत्सवातही विद्यासभा भरते. भारतातून विद्वान प्राध्यापक, संशोधक शास्त्रीपंडित, वैदिक येतात. आचार्य–जीवनकार्यावर बोलतात, निबन्ध वाचतात, विद्यासेवा सादर करतात. तृप्त, शांतचित्ताने 'पुनरागमनाय' आपापल्या गावी परत जातात.

मार्ग (नकाशा पान १३ वर)

शृंगेरी पुण्याच्या दक्षिणेला सुमारे ५०० मैल अंतरावर आहे. पुणे-मिरज आणि मिरज-बंगलोर रेल्वेने हुबळीच्या पुढे हरिहर स्टेशनवर उतरून तिथून एस्. टी. बसने ५० मैल शिमोगा आणि शिमोगा येथे बस बदलून पुन्हा ६० मैल गेल्यावर शृंगेरीला आपण जाऊन पोचतो, तेव्हा पुणे-शृंगेरीच्या या सुमारे २८ तासाच्या प्रवासाचा शीण तुंगा स्नानाने, शारदाम्बा–दर्शनाने आणि तेथील निसर्गरम्य परिसराने केव्हाच निघून जातो.

रेल्वेची दुसरी श्रेणी (शयन आरक्षणासह), एस्. टी. चा प्रवास आणि शृंगेरीपीठातील चार सहा-दिवस निवास-भोजनाची व्यवस्था मठातर्फे निःशुल्क झाली तरी फराळ-पाणी इ.किरकोळ अवांतर खर्च गृहीत धरला तर शृंगेरी पुणे ही यात्रा सुमारे सव्वाशे (रु. १२५–००) रुपयांत प्रौढांची आणि लहान मुलांची (रु. ७५–००) पाऊणशेपर्यंत अगदी मजेत पार पडू शकते. रेल्वेची प्रथम श्रेणी अगर खाजगी टॅक्सी, माटाडोर यासारख्या गाड्यांनी गेल्यास याच्या तिप्पट खर्च आणि अर्थात तितकाच आराम मिळू शकतो

कर्नाटक राज्यशासन आणि भारत केंद्रशासन यांचे या निसर्गरम्य तीर्थक्षेत्राकडे तसे मुळीच लक्ष नाही. अर्थात यामुळे तिथे शान्तता ! व्रतानुष्ठाने चालू आहेत याचा साक्षात्कार घडतो. या तपस्यानुकूल वातावरणाला धक्का लागणार नाही अशा बेताने, समाजाने आणि शासनाने या तीर्थक्षेत्राचे ठिकाणी काही मर्यादित सोयी करणे राष्ट्रोपकारक ठरेल.

श्री. शंकरराव थत्ते यांचे
मध्यमवर्गीय लोकांना
राहण्यासाठी

●

**पुणे शहरातील मध्यवर्ती
आधुनिक सुखसोयींनी परिपूर्ण
भव्य निवासस्थान.**

●

१७१२।१ ब, सदाशिव पेठ,
पुणे ३०.
दूरवाणी : ४२४४१
तार : 'कार्योद्यान' पुणे

आधुनिक, अजोड सुखसोयींनी परिपूर्ण
निवासस्थान

उद्यान निवास

१७१२।१ब, सदाशिव पेठ,
स्काउट ग्राउंडसमोर, पुणे २

तार :"कार्योद्यान"



Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri





श्री शारदांबा व श्री चंद्रमौलेश्वर यांची पूजा करतांना...

महाराज गंगापूजन करीत आहेत (तुंगा नदी)

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri



७८८) शृंगेरीपीठ-जगद्गुरु-परंपरा (१९७५

	संन्यास इ. स.	समाधि इ. स.
१) श्रीशंकरभगवद्पाद	७८८	८२०
२) श्रीसुरेश्वराचार्य	८१३	८३४
३) श्रीनित्यबोधघन	८१८	८४८
४) श्रीघनाघन	८४६	९१०
५) श्रीज्ञानोत्तम	९०५	९५४
६) श्रीज्ञानगिरी	९५०	१०३८
७) श्रीसिंहगिरी	१०३६	१०९८
८) श्रीईश्वरतीर्थ	१०९७	११४६
९) श्रीनृसिंहतीर्थ	११४६	१२२९
१०) श्रीविद्याशंकरतीर्थ	१२२८	१३३३
११) श्रीभारतीकृष्णतीर्थ	१३२८	१३८०
१२) श्री विद्यारण्य	१३३१	१३८६
१३) श्रीचन्द्रशखरभारती १	१३६८	१३८९
१४) श्रीनरसिंहभारती १	१३८८	१४०८
१५) श्रीपुरुषोत्तमभारती १	१४०६	१४४८
१६) श्रीशंकरभारती	१४२९	१४५५
१७) श्रीचन्द्रशेखरभारती २	१४४९	१४६४
१८) श्रीनरसिंहभारती २	१४६४	१४७९
१९) श्रीपुरुषोत्तमभारती २	१४७२	१५१७
२०) श्रीरामचंद्रभारती	१५०८	१५६०
२१) श्रीनरसिंहभारती ३	१५५७	१५७३
२२) श्रीनरसिंहभारती ४	१५६३	१५७६
२३) श्रीनरसिंहभारती ५	१५७६	१६००
२४) श्रीअभिनवनरसिंहभारती १	१५९९	१६२३
२५) श्रीसच्चिदानन्दभारती १	१६२२	१६६३
२६) श्रीनरसिंहभारती ६	१६६३	१७०६
२७) श्रीसच्चिदानन्दभारती १	१७४१	१७६७
२८) श्रीअभिनवसच्चिदानंदभारती १	१७४१	१७६७
२९) श्रीनरसिंहभारती ७	१७६७	१७७०
३०) श्रीसच्चिदानंदभारती ३	१७७०	१८१४
३१) श्रीअभिनवसच्चिदानंदभारती २	१८१४	१८१७
३२) श्रीनरसिंहभारती ८	१८१७	१८७९
३३) श्रीसच्चिदानंदशिवअभिनवनरसिंहभारती	१८६६	१९१२
३४) श्रीचंद्रशेखरभारती ३	१९१२	१९५४
३५) श्रीअभिनवविद्यातीर्थ	१९३१	
३६) श्रीभारतीतीर्थ	१९७४	

पीठावरील सध्या असणारे ३५ वे महाराज यांना १९५४ साली पीठाभिषेक झाला.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

रत्नागिरी जिल्ह्यातील पर्यटन केंद्रांचा विकास

महाष्ट्रातील किल्ले ही लेखमाला सातत्याने 'पर्यटन' मधून लिहिणारे दुर्गप्रेमी श्री. प्र. के. घाणेकर यांनी सागरी आकर्षण केंद्राच्या विकासाबद्दल आपले विचार प्रकट केले आहेत. त्यांतील सूचना वाचकांना व संबंधितांना निश्चितच अभ्यासार्ह वाटतील यात शंका नाही.

प्र. के. घाणेकर

पर्यटनच्या नोव्हेंबर १९७५ च्या अंकात पृष्ठ ६९ वर वरील बातमी वाचली. वेगुर्ला, सिंधुदुर्ग, परशुराम मंदिर, हर्णे, गणपती पुळे या परिसरासाठी १३ लक्ष रुपये खर्च करून तो भाग पर्यटकांचे आकर्षण केंद्र बनविण्याची योजना असल्याचे कळले. त्याबाबत मला सुचलेले कांही विचार मी आपणापुढे विचारार्थ ठेवीत आहे.

बहुप्रसवा वसुंधरेचा श्रीमंत भाऊ रत्नाकर

समुद्र म्हटला म्हणजे आपल्यापुढे मालवाहू व प्रवासी गलबते मासेमारी करणारे कोळी, मिठागरे आणि फार फारतर मोती, एवढ्याच गोष्टी आपल्या डोळ्यापुढे येतात.

पण या सुदर्शन रत्नाकराच्या पोटात आणखी बरेच काही आहे. सध्या सागरातळाजवळील काळ्या सोन्याच्या शोधार्थ अविरत प्रयत्न चालू आहेत व त्यात बऱ्याच प्रमाणात यशही येत आहे. सागराच्या पोटात असलेली अनेकरंगी, चित्रविचित्र जलजीवसृष्टी पहावयाची म्हणजे मुखवटे, गॉगल्स, वल्ही (फिन्स), प्राणवायूची नळकांडी, प्रखर प्रकाशझोत, विषारी व मांसभक्षक प्राण्यांपासून बचाव होण्यासाठी आवश्यक अशी प्राणसंरक्षक आयुधे यांची जरुरी असते. किंवा काचेचा तळ असलेल्या खास बोटी,पाणबुड्या यातील सफर किंवा समुद्रतळात खोदलेले, काचेच्या भिंती असलेले बोगदे आवश्यक ठरतात. अशा गोष्टी उपलब्ध करून देण्यासाठी काही प्राथमिक खर्च आवश्यक असतो हे खरे. पण त्यामुळे आकर्षित झालेल्या पर्यटकांकडून हा खर्च केव्हाच वसूल होतो.

जल जीवसृष्टीचा समतोल

संरक्षित उद्यानांप्रमाणे अथवा अभयारण्यांप्रमाणे सागरी पर्यटन केंद्राजवळही तेथील जलजीवसृष्टीत ढवळाढवळ न होऊ देण्याची काळजी घेतली म्हणजे तेथील समतोल बिघडत नाही. तऱ्हेतऱ्हेचे मासे, ऑक्टोपस, सेपिया, हलते चालते शंख-शिंपले, समुद्रतारे आणि समुद्रछत्र्या, समुद्रकाकड्या अन् रंगीबेरंगी प्रवाळ या शिवाय नाना रंगांची अन् तऱ्हतऱ्हेची सागरी शेवाळी यांचे दर्शन घेण्यासाठी सर्व सोयींनी उपलब्ध असे समुद्र उद्यान (मरीन गार्डन्स) देशी व परदेशी प्रवाशांना खचितच आकर्षित करील.

सागरी उद्यान

फोर्ट जेफर्सन नॅशनल मान्युमेंट हे अमेरिकेतील पहिले सागरी उद्यान. के वेस्ट शहराच्या पश्चिमेस ६५ मैलांवर असलेल्या या उद्यानाचा विस्तार ४७, १२५ एकर आहे. विविधरंगी व चित्रविचित्र आकाराचे मासे, कोरल्स यांच्या दर्शनासाठी जगद्विख्यात असलेले हे उद्यान म्हणजे सागरी पर्यटकांचे काश्मीर! केनिया,सुदान,इस्त्राइल,ऑस्ट्रेलिया, फिलीपाइन्स, जपान अशा अनेक देशांनी १९६२ च्या पहिल्या राष्ट्रीय उद्यानांच्या जागतिक परिषदेनंतर सागरी उद्याने उभारण्यात पुढाकार घेतला. फोर्ट जेफर्सनशिवाय व्हर्जिन बेटे व बकबेट रीफ नॅशनल पार्क आणि पोर्टोरिको येथेही सागरी उद्याने अमेरिकेने निर्माण केली आहेत.

मग आपणच या बाबतीत मागे का असावे? मुंबईपासून गोव्यापर्यंत पसरलेल्या आपल्या विस्तीर्ण सागरकिनाऱ्याचा पर्यटनकेंद्र म्हणून विकास करावयाचा असेल तर अशा छोट्यामोठ्या सागरी उद्यानांची साखळीच निर्माण करावयास हवी. साहजी सागरी पर्यटकांना या व अशाच ठिकाणी यांत्रिक व साध्या होड्या, सर्फ रायडिंग व असेच सागरी खेळ, टुमदार छोटेखानी टूरिस्ट कॉटेजेस उपलब्ध करून द्यावयास हवीत.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

एखाद्या सागरी जलजीवालयाची (मरीन ॲक्वेरियम) उभारणी, खास सागरी प्राणी व वनस्पतींपासून तयार केलेले चविष्ट पदार्थ देणारीं उपहारगृहे यामुळे त्या आकर्षण केंद्रांचा आगळेपणाही वाढविता येईल. खास पर्यटकांसाठी फिशरीज उभारून हौशी मासेमारांना योग्य त्या सुविधाही उपलब्ध होणे जरूर आहे.

समुद्राच्या लाटांपासून विद्युतनिर्मिती करणारी केंद्रे उभारून विजेच्या बाबतीत ही केंद्रे स्वावलंबीही बनविता येतील.

सिंधुदुर्गासारख्या शिवलंकेवर शिवछत्रपतींचे आरमारासंबंधी, त्यांच्या सागरी मोहिमांसंबंधी, सागरी दुर्गरचनेची वैशिष्टे विषद करणारी मॉडेल्स उभारून, सागरी दुर्गांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन उभारल्यास ते एक आकर्षणकेंद्र बनेल. मुंबई-मालवण, पुणे-मालवण अशा एस. टी. बसेसची उणीवही प्रकर्षाने जाणवते. तसेच साताऱ्याहून कोयनेच्या पलिकडील वनदुर्ग वासोटचा जवळून तिवरा घाटाने चिपळूणपर्यंत रस्ता झाल्यास प्रवासास लागणारा वेळ किती तरी कमी करता येणे शक्य आहे. पर्यटनकेंद्रांचा विकास करताना, वाहतुकीच्या नवनव्या सोयी करताना, पर्यटक कुटीरे बांधताना, कमीतकमी जंगलतोड व जितकी झाडे तोडली त्याच्या दुप्पट लावण्याची काळजी घेणेआवश्यक आहे. नाही तर आकर्षणकेंद्रांचा आत्माच हरवून जाईल.

पर्यटकांना आकर्षिण्यासाठी नवनवीन मार्ग स्वीकारले पाहिजेत.

☐

आमच्या ग्राहकांना आकर्षक बनविण्यासाठी आम्ही नित्यनवे कसब पणाला लावीत असतो.

☐

एलोरा टेलर्स
लक्ष्मी रोड,२ रा मजला,
सेवासदन बिल्डिंग,
पुणें ३०.

Poona Coffee House
Deccan Gymkhana,
Poona 4,

It is more than a restaurant
It is a Sight–seeing place !

ENJOY YOUR COMFORTABLE TOUR WITH mastakar TRAVELLERS



DAY & NIGHT SERVICE
BUSES • MINI BUSES • STATION WAGON
CAR • AMBULANCE & HEARSE.
ON HIRE FOR
BOMBAY & OUT OF BOMBAY
, Shantaram Niwas, Gokhale Rd., (North)
Dadar, Bombay 400 028, TELEPHONE: 457556

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

पेठचा किल्ला ऊर्फ कोतळी गड

म हा रा ष्ट्रा ती ल कि ल्ले

लेखांक : १५

– प्र. के. घाणेकर

या लेखांत कर्जत जवळच्याच एका रम्य दुर्गाचे दर्शन वाचकांना घडेल इतिहासाच्या साक्षी मिरविणाऱ्या अशा स्थळांना वेगळ्या धर्तीचे सहल केंद्र म्हणूनही कितीतरी महत्व येऊ शकेल.

कर्जतपासून अवघ्या १४ मैलांवर ईशान्येस आणि नेरळच्या पूर्वेस १२ मैलांवर एक इतिहासाचा मानकरी आपला उत्तुंग माथा वर उंचावून मोठ्या डौलाने उभा आहे. कर्जतहून खेड कडूसकडे जाणाऱ्या कोलिंबा घाट व सावळ घाटावर आपली नजर लावून बसलेला हा किल्ला म्हणजे कोतळीगड. कांहीजण त्यालाच कोथळागड या नावाने ओळखतात. आसपासच्या रहाळात मात्र याचा उल्लेख पेठचा किल्ला असाच करतात.

रम्य परिसर

किल्ले ढाकच्या डोंगररांगेस खेटून तशीच एक आडवी रांग पसरली आहे. त्यानंतर आहे ती सिद्धगड व भिमाशंकराची विस्तीर्ण डोंगरांची मालिका. हिरव्या गच्च झाडीने झाकाळलेला पायथा, आणि नितळ पाण्याने खळाळणारे ओढे आपला पदप्रवास सुखाचा करतात. या दाट झाडीतून डोंगरमाथ्यावर आल्यावर नजरेस पडते ते विस्तीर्ण गवताळ पठार, त्यात कोतळीगडाचा सुळका व पेठगावची चंद्रमौळी घरे; मोठी लोभसवाणी वाटतात. थेट कर्नाळ्याच्या सुळक्याची आठवण करून देणाऱ्या ह्या सुळक्यावर जावयाचे म्हणजे छाती दडपून जाते. कर्नाळ्याच्या सुळक्यावर जातानाच्या चित्तथरारक, रोमांचकारी अनुभवाची पुनरुक्ती होणार असे वाटते. पण तसे घडणार नसते. कोणा कल्पक दुर्गरचनाकाराने जनसामान्यांनाही ह्या सुळक्यावर जाण्यासाठी तो सुळका आतून पोखरून गुडघ्याइतक्या उंचीच्या पायऱ्या खोदून तो दुर्गम भाग सुगम केला आहे.

दोन मुख्य विभाग

कोतळी गडाचे दोन भाग पडतात. एक सुळक्याखालचा व ऐन सुळक्यावरचा पाचशे फूट लांब अन् दोनशे फूट रुंदीचा माथा !

सर्व चढण संपवून आपला प्रवेश प्रथम खालच्या किल्ल्यावर होतो. सामोऱ्या येतात त्या अप्रतीम गुहा. उजवीकडची देवीची मूर्ती असलेली गुहा व त्याजवळील टाके आपणास विसाव्यासाठी खुणावते, पण अधिक आरामशीर गुहा मात्र पुढेच आहे. गुळगुळीत कातळाच्या जमिनीवर अंग टाकताच झुळझुळणारा वारा आपला श्रमपरिहार करतो या चांगल्या ऐसपैस गुहेत एका भैरोबाचे (?) स्थान आहे. कमरेइतक्या उंचीच्या कट्ट्यावर हा खेडुतांचा देवाधिदेव स्थानापन्न झाला आहे. छताला आधार देणारे उत्तम कोरीवकाम असलेले खांब दुर्गरचनाकाराच्या सौंदर्य जाणिवेची ग्वाही देतात. गुहेच्या सपाट, गुळगुळीत जमिनी, वर काही गोल खड्डे दिसतात, आणि एक ५–६ इंच व्यासाचा दगडी गोल गोळा दिसतो. पांडव वनवासात असताना ते तेथे उतरले असता भीमाला गोटचा खेळण्याची लहर आली, त्यापैकी एक गोटी व हे खड्डे म्हणजे गोटचांसाठी केलेले खड्डे अशी कहाणीही आपणास ऐकवली जाते.

किल्ल्याच्या सुळक्यावर जाण्यासाठी खोदलेल्या भुयारी मार्गातील पायऱ्या जरी दमछाट करीत असल्या तरी वर पोहोचल्यावर तेथील मंद वारा, शीतल पाण्याचा जलाशय व आजूबाजूची शोभा पाहून मन प्रसन्नचित्त होते.

आख्यायिका

या किल्ल्याविषयी विशेष प्रसिद्ध नसलेली एक मनोरंजक आख्यायिका येथे सांगणे उचित ठरेल असे वाटते.

संभाजीच्या कारकीर्दीत झालेल्या मुघल–मराठे लढ्याचे वेळी मराठ्यांचा शस्त्रास्त्रांचा बराच मोठा साठा येथे होता. अब्दुल कादर (मुखलीसखानाचा जावई) ८-११-१६७४ रोजी गडाचे दरवाज्यापाशी ससैन्य आला. माणकोजीं पांढरे या मराठा सरदाराने हे आपलेच लोक असून, ते कमी पडलेली शस्त्रे नेण्यास आले आहेत असे भासवून त्यांचा किल्ल्यात प्रवेश करवून घेतला. आत जातांच तेथे

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri



कोतळीगड माथा
झाडामागे सिंधगड



कोतळीगड
मंचकरवाडी-
कडून



किल्ले
कोतळीगड



Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri



पेठच्या किल्ल्याचा परिसर व मार्ग दाखविणारा कच्चा नकाशा

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

असलेल्या शिबंदीवर हे शत्रूसैन्य तुटून पडले व किल्ला आलमगीराच्या ताब्यात गेला.

हाती पडलेल्या या किल्ल्याची सोन्याची किल्ली व ते शुभवर्तमान दिल्लीपती औरंगजेबाला मोठ्या त्वरेने कळवण्यात आले. अपेक्षा अशी होती की ही वार्ता ऐकताच मोठे बक्षिस ताबडतोब मिळेल. पण त्या पाताळयंत्री, धूर्त व सहकाऱ्यांवर विश्वास नसलेल्या ह्या बादशहाने त्या बातमीचा खरेखोटेपणा पडताळून पाहण्यासाठी आतीशखान नावाच्या अधिक विश्वासू सरदारास तेथे पाठविले. त्याचा अहवाल, गडाचा नकाशा, तेथे आवश्यक असलेल्या दुरूस्तीची माहिती इ. मिळताच अब्दुलखानास रु. १०,००० बक्षीस, गडाच्या डागडुजीसाठी ४० कुशल रचनाकार व इतर शाही फितुऱ्यांसाठी २५०० ची रक्कम व सोन्याचांदीची कडी पाठविण्यात आली. गडाचे नामकरण करण्यात आले– "मिफ्ताहुलफतह." अर्थात हे हेंगाडे नाव कालौघात टिकले नाहीच.

१६८४ मध्ये नारोजी त्रिबक व त्याच्या शूर सवंगड्यांनी हा किल्ला परत जिंकून घ्यावयाचा प्रयत्न केला पण त्यात त्यांना यश आले नाही. खुद्द नारोजी युद्धात मरण पावला व त्याचे शव इद्दतमामखानाचे हाती पडले. त्याची त्याने घोर विटंबना केली व नारोजीचे मस्तक किल्ल्याकडे येणाऱ्या रस्त्यावर टांगून ठेवले. १६८५ मध्ये पुनः एकदा अयशस्वी प्रयत्न केल्यानंतर मात्र मराठ्यांनी या किल्ल्याचा नाद सोडलेला दिसतो.

किल्ल्याच्या माथ्यावरून पश्चिमेकडे बघितल्यास उजव्या हातास भिमाशंकर (तेथील कलावंतिणीचा महाल, नागफणी, वाघाचा डोळा), सिद्धगड, समोरील बाजूस मलंगगड, चंदेरी, कर्नाळा, प्रबळगड, विशाळगड, माणिकगड, पेठ किल्ला, माथेरानचे पठार, असा विस्तृत प्रदेश नजरेस येतो.

जायचे कसे

किल्ल्यावर जाण्यासाठी कर्जतहून कोंठिबे अगर आंबिवली गावी जाण्यास राज्य परिवहन महामंडळाची बस. सायं. ६॥ वाजता सुटते. रात्री तेथे पोहोचल्यावर देखील चांदण्या रात्री माहीतगार वाटाड्या घेऊन किल्ल्यावर पोहोचता येते. कोठिंब्याहून पेठच्या या किल्ल्यावर जाण्यास ५ तास पुरतात. या शिवाय मेचकरवाडी धामणीकडूनही उत्तम रस्ते आहेत. तसेच कर्जतहून खांडस गाडीने खांडसला गेल्यास एका कच्च्या रस्त्याने शिडीच्या वाटेने वर जाता येते. मात्र कोठिंबे, आंबिवली, मेचकरवाडी, धामणी या गावांकडून वर जाण्यास सडकेची व नळीची, नाळेची वाट अशा दोन मार्गाने जाता येते. रात्री गडावर मुक्काम करून सकाळी दुर्ग दर्शन करून २ चे आंत कोठिंब्यावरून कशेळी अगर कशेळी फाट्यावर डांबरी रस्त्यावर येणे आवश्यक आहे नाहीतर कर्जतला पोहोचण्यास सोयीस्कर बस अगर इतर वहान नाही. ४ चे बेतात कर्जतला पोहोचल्यावर पुणे, मुंबईकडे जाण्यास सोयीच्या गाड्या मिळतात.

उत्कृष्ट कोल्ड्रिंक्स व आईस्क्रीम्ससाठी

गणू शिंदे
कोल्ड्रिंक्स

१०, सरस्वती विलास
लक्ष्मी रोड, पुणे ३०.

या भेसळीच्या युगात विश्वासाचा दीपस्तंभ म्हणजे 'केप्र' उत्पादनें होय ! निर्भेळता * स्वादिष्टता * उत्कृष्ठता यासाठी फक्त 'केप्र' च.

कृपया संपर्क साधा–
केशवलक्ष्मी प्रसाधन,
मसालेवाले
कन्याशाळेजवळ, पुणे ४११ ०३०

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

प्रवास हा सुखाचा

●

गो. सी. धार्गळकर
ना. त्र्यं. मिरवणकर

गजबजाटा पलीकडे

ठाणे जिल्ह्यातील वाडा व जव्हार या ठिकाणांस भेट देण्यास फारच थोडे प्रवासी जात असतील, कारण ही दोन्ही ठिकाणे मागासलेल्या आदिवासी मुलखात मोडतात. तेथे आसपास जंगल आहे ते मुख्यत: साग व केंजळ या झाडांचे. अधूनमधून भातशेती होते. दोन्ही ठिकाणी (विशेषत: जव्हारला) प्रवाशांस उतरण्यास सोयीची हॉटेल्स नाहीत. पण मुंबईसारख्या दाटीवाटीच्या शहराबाहेर निसर्गाच्या सान्निध्यात एक–दोन दिवस विश्रांती व बदल म्हणून या ठिकाणी जायला हरकत नाही.

आमच्या 'भ्रमण मंडळा' ने वाड्याला व जव्हारला जायचे ठरविले ते मुख्यत: श्री. व्यंकटेश बी. मानकामे यांच्या निमंत्रणामुळे. श्री. मानकामे (B. Sc. (Agri) M. F. S. असून वाडा येथे असिस्टंट कॉंझर्व्हेटर ऑफ फॉरेस्टस् (रीसर्च स्टेशन) या हुद्यावर आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध तऱ्हेच्या वनस्पती पाहणे व त्यांनी जंगली प्राण्यांचे घेतलेले अनुभव ऐकणे हाही आमच्या सफरीचा उद्देश होता.

एके रविवारी दोन मोटारींतून आम्ही मुंबईहून वाड्यास जाण्यासाठी निघालो. ठाणे व भिवंडीवरून हा रस्ता जातो भिवंडीपर्यंत हायवे असल्यामुळे हा प्रवास आरामात पार पडला. भिवंडी येथे श्री. नानासाहेब सावंतांनी त्यांचे यंत्रमाग दाखविले. त्यांच्या घरचे आदरातिथ्य स्वीकारून पुढचा प्रवास चालू झाला.

आता शहरी मुलूख मागे पडून डोंगराळ जंगलांनी भरलेला मुलूख लागला. रस्त्याच्या कडेला लागणाऱ्या गावांचे स्वरूप पालटले. दहा-पंधरा कौलारू घरे वा गवती झोपड्या, एकादे दुसरे खोपटातले पान-विडीचे दुकान वा हॉटेल; तेथे पान खाणारे किंवा चहा पीत बसलेले अपुऱ्या कपड्यांतले आदिवासी; वस्तीच्या दैनंदिन गरजा भागविणारे किराणा मालाचे दुकान; बाजारास निघालेले ग्रामीण लोक, हा भाग मुंबईच्या इतका जवळ असूनही शहरी सुधारणेपासून फार वंचित राहिलेला दिसला. वाहतुकीच्या साधनांचा अपुरेपणा. औद्योगीकरणाची अशाश्वती व शिक्षणाचा अभाव ही त्यामागील कारणे असावीत. या भागातील जंगल विशेष दाट नसले तरी शहरातील सिमेंट कॉंक्रीटचे ठोकळेवाज जंगल रोज पाहून कंटाळलेल्या नजरेला हे खरें जंगल पाहून आल्हाद वाटतो व मरगळलेल्या मनावर प्रसन्नतेची झळाळी चढते. हे जंगल एरव्ही पहायला चांगले वाटले तरी अशा जंगलात गाडी बंद पडून रखडण्याचा प्रसंग आला, तर कठीण परिस्थिति निर्माण होते. श्री. सराफांची नुकतीच दुरुस्त केलेली गाडी वाड्याच्या अलिकडे १५ मैलांवर तानसा उद्योगकेंद्रापाशी बंद पडली. मशीन उघडून पाहता आत एक घूस आढळली पण तिला बाहेर हाकलल्यावरही गाडी सुरू होईना शेवटी दुसऱ्या गाडीला दोरखंडाने बांधून तिला वाड्यापर्यंत ओढत नेण्याखेरीज गत्यंतरच उरले नाही. (वाड्याच्या एका वर्कशापमध्ये तपासणी झाल्यावर तो खराब 'कॉईल'चा दोष होता, घुशीचा नव्हता हे सिद्ध झाले.) सुरळीतपणे सर्व प्रवास पार पडला तर तो प्रवास कसला ! अधून मधून अडचणी, संकटे यावीत व त्यांचे निवारणही व्हावे यात प्रवासाची रंगत वाढते !

दुपारी १ च्या सुमारास श्री. मानकामे यांच्या घरी पोहोचल्यावर त्यांनी सर्वांचे आगतस्वागत केले. त्यांच्या मनमिळाऊ व मोकळ्या स्वभावामुळे आमचा संकोच दूर झाला. दुपारच्या जेवणाला बरोबर नेलेल्या चटणी-ब्रेड-कोथिंबीरवड्या, श्रीखंड, मसालेदार वांगी आदी पदार्थांनी खूप रंगत आणली.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

वैशिष्ट्यपूर्ण प्लॅट नर्सरी

सायंकाळी वाड्यापासून तीन मैलांवर असलेली 'प्लॅट नर्सरी' दाखवायला श्री. मानकामे सर्वांना घेऊन गेले. या १५० एकरात पसरलेल्या नर्सरीमध्ये बांबूचे विविध प्रकार लावले आहेत. रबराची लागवड आहे. सुरू (casuarina Eynisetifolia) काजू, साग, अशोक यांची पद्धतशीर वाढ केली आहे. वाळवंटाचा फैलाव थोपविण्यासाठी सुरूचा उपयोग होतो. साग फर्निचर व बांधकामात वापरतात. (Tectona Granais)

येथे वनस्पतींतील काही वैशिष्ट्यपूर्ण प्रकार पहावयाला मिळाले. सर्वगंधा (Rauwolfia serpentina) ही वैद्यकशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाची वनस्पती. हिच्यापासून वेगळे करण्यात येणारे औषध रक्तदाब,निद्रानाश विकृती आदिवर गुणकारी ठरते आहे. हिची पाने अनंताच्या पानासारखी काळसर हिरवट दिसतात. फुले लहान तांबडी असतात. मृगनक्षत्रात उगवणारी व पाऊस संपताच नष्ट होणारी अनंतमूळ वनस्पती रक्तशुद्धीवर औषधात वापरली जाते. दालचिनी (हिच्या पानांचा, तमालपत्रांचाही मसाल्यात वापर होतो), वेलची, जायफळ, कोकम (याच्या फळापासून मधुर, पित्तशामक पेय बनविता येते.)आदि व्यापारी महत्त्वाच्या वनस्पतिही येथे पहायला मिळतात. 'सिट्रोनेला' या सुगंधी गवतापासून जे तेल निघते, त्याचा अत्तरांत व पर्फ्यूम्समध्ये वापर केला जातो. ही वनस्पती साधारणतः गवती चहासारखी दिसते, पण दोहोंच्या वासांत बराच फरक आहे. सिट्रोनेलाचा खुशबू काही विलक्षणच आहे. तो मन धुंद करून सोडतो. 'बर्सेरा' (Bursera Dalpichiana) ह्या झुडपाचे खोडच सुगंधमय असते असे नसून पानांनाही प्रसन्न सुगंध येतो. तांबूस रंगाचे हे ओलसर खोड सहज जळू शकते. श्री. मानकामे यांनी विशेष रस घेऊन सर्व माहिती दिल्यामुळे निसर्गाच्या सान्निध्यातला हा फेरफटका सर्वांनाच फार आवडला.

रात्री मानकामे यांच्या घरी आग्रहाचे जेवण झाले. जेवणाच्या विविध परीबरोबर कर्णमधुर संगीताची बरसात होती. श्री. मानकामे स्वतः संगीताचे शौकीन जाणकार. त्यांच्या ध्वनिमुद्रिकांच्या संग्रहावरूनच त्यांची दर्दी रसिकता आम्हाला समजून आली. चांदणी रात्र असल्यामुळे जेवणानंतर भटकणे ओघानेच आले. वाडा गावात पहाण्यासारखे काही नाही. अवघे पंधरा हजार वस्तीचे तालुक्याचे ठिकाण; त्यामुळे तासाभरात ही भटकंति पूर्ण झाली. आल्हाददायक चांदणे, सुखद थंडी, इष्टमित्रांचा सहवास, गप्पाटप्पा आणि हास्य-विनोद इतक्या गोष्टी हजर असताना गाव कसे आहे यांची फिकीर कोण करतो ! मुंबईत चांदणे व थंडी यांची जेमतेम तोंडओळख असलेले आम्ही, या नवख्या वातावरणात रमलो यांत काहीच नवल नाही. मुंबईपासून आम्ही फक्त ५० मैलांवर असलो तरी खूप दूर गेल्याचा आभास निर्माण झाला, तो त्या विशिष्ट वातावरणामुळे.

जव्हारकडे कूच

दुसऱ्या दिवशी सकाळी चहापानानंतर आमच्या गाड्या जव्हारला जायला निघाल्या. जव्हार हे ब्रिटिश राजवटीत एक छोटेसे डोंगराळ संस्थान होते. मुख्यतः आदिवासीची वस्ती असलेले जव्हर गाव आज ठाणेजिल्ह्यातीलएक तालुका केंद्रआहे. जव्हारला जाणारा मार्ग पालीसारख्या छोट्याछोट्यागावांतून जातो. मार्गात वेगळेच दिसणारे व बोलभाषा बोलणारे आदिवासी भरपूर प्रमाणात दिसतात. आदिवासी स्त्रियांचा दागिन्याचा शौक नजरेत भरण्याजोगा असतो. पुरुषही स्त्रियांप्रमाणेच रापट वर्णाचे दिसतात. सतत जंगलऊन, पाऊस अशा वातावरणात राहून ते भरपूर काटक

पुण्यात आल्यानंतर
आपणास आवडेल असे
शांत, मध्यवर्ती, हवेशीर निवासस्थान
होटेल स्वस्ति
१२३४, आपटे रोड पुणें ४.
फोन : ५५५००

दुर्गा भुवन
प्रोप्रा. बारी ब्रदर्स. २३३, बुधवार पेठ, मंडई रोड, पुणे २. फोन ५५४१२
गेल्या १९ वर्षांत आमच्यात बरेच बदल झाले.
अंतर्गत सजावट तर खूपच बदलली.
मात्र चवदार मांसाहारी जेवण देण्याची आमची सवय मात्र अजून तशीच आहे.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

बनतात. शहरी करमणुकीपासून व [illegible] असलेले हे लोक विडी वा चिलिम आणि गावठी दारूत मन रमवतात. त्यांच्या खडतर जीवनात याखेरीज फारसा विरंगुळा नसतो.

वाडा ते जव्हार या सुमारे ३५ मैलांच्या प्रवासात भातशेतीबरोबरच खुरटे जंगल दिसते. मधून मधून दाट जंगलाचे पट्टेही दिसतात. मोठ्या पसरट पानांचे, मजबूत खोडाचे सागवृक्ष व लांबट पानांचे, किरकोळ दिसणारे केंजळ वृक्ष विपुल प्रमाणात लागतांत. या रम्य भागात एक छोटासा घाटही आहे. हा सोपा घाट चढल्यावर पाहता पाहता जव्हार गाव दिसू लागले.

४००० वस्तीच्या या गावी एक छोटासा बाजार आहे. कापडचोपड, किराणामाल, मातीची मडकी, भाजीपाला, दैनंदिन गरजेच्या वस्तू तेथे मिळू शकतात. गावातील तांबडमातीच्या वैपुल्यामुळे माथेरान महाबळेश्वरसारखे वाटते. गाव समुद्रसपाटीपासून १५०० फूट उंच व जंगलांनी वेढलेले असल्यामुळे येथील हवा प्रसन्न आहे.

गावातील टोलनाक्याजवळ उजवीकडे वळल्यावर एक व्हयू पॉईंट व हनुमान मंदिर लागले. या व्ह्यू पॉईंटवरून दूरवर ब्रह्मगिरीचा पहाड (नाशिक–त्र्यंबकेश्वरजवळचा) दिसतो. (जव्हार ते त्र्यंबकेश्वर फक्त २५ मैल अंतर आहे.) उजवीकडे २–३ फर्लांग अंतरावर सर्किट हाऊस दिसते. खाली जंगविभाग व शेती दिसते.

या गावात पूर्वी पाण्याचे दुर्भिक्ष्य होते. विशेषतः उन्हाळ्यात फार पाणीटंचाई जाणवे. पण गावच्या पाणीपुरवठ्यासाठी येथून २–४ मैलावरच एक योजना चालू करण्यात आली. एक दगडी बंधारा व संबंधित काम १२,२७००० रु. खर्च करून बांधण्यात आले व 'जयसागर' हा रमणीय तलाव निर्माण झाला. सप्टेंबर १९६१ मध्ये जव्हारचे राजे श्रीमंत यशवंतराव मुकणे यांचे हस्ते त्याचे उद्घाटन झाले. आम्ही या तलावाला भेट दिली तेव्हा तलावाचा निसर्गरम्य आसमंत अगदी शांत होता. या तलावा जवळ कांही प्रवासी सुखसोयी (उदा. मॉटेल, रेस्टॉरंट, फिशिंगची सोय इ.) उपलब्ध होतील तर हे एक जव्हारचे आकर्षण बनू शकेल असे माझ्या मनात आले. जव्हारला राहण्यायोग्य अशा हॉटेलांचीही निकड आहे. अशी हॉटेल्स तयार झाली. तर मुंबईकरांना 'वीक-एन्ड'साठी हे नवीन ठिकाण उपलब्ध होईल. पण त्याचबरोबर गावात मोटारगाड्यांची वर्दळ वाढेल व त्याचे सध्याचे शांत स्वरूप विस्कळीत होईल अशी रास्त शंका वाटते. (मुंबई-जव्हार अंतर ८० मैल आहे.)

दुपारी ४ वाजता आमच्या गाडया वाड्याला श्री. मानकामे यांच्या घरी पोहोचल्या. सौ. मानकामे यांनी अगत्यपूर्वक बनविलेल्या चवदार जेवणाचा सर्वांनी मनःपूर्वक आस्वाद घेतला. थोडी भोजनोत्तर विश्रांती झाली.

थ्रिलिंग अनुभव

या प्रवासांतील आणखी एक संस्मरणीय गोष्ट म्हणजे श्री. मानकामे यांच्या १०-१२ वर्षाच्या जंगलातील नोकरीचे काही चित्तथरारक अनुभव. त्यांचे काही अनुभव ऐकून आम्हालाही 'थ्रिल' वाटले. ते म्हणाले,

'कोईमतूरच्या जंगलात ट्रेनिंग कँपमध्ये असताना एका विषारी सापाशी गाठ पडली होती. कँपात विटांच्या आधारावर सर्वांच्या बॅग्ज लावल्या होत्या. रोज आम्ही आपापली बॅग कामानिमित्त उघडत होतो व बंद करीत होतो. एका विद्यार्थ्याचे कान तिखट होते. त्याला त्या जागेत फुस्-फुस् चालली असल्याचा दाट संशय होता. पण मी ती गोष्ट उडवून लावली. तीन आठवड्यानी कँप संपला. तेव्हा बॅगा वगैरे सामान हलविण्यात आले. माझी बॅग उचलल्यावर खाली मोठा साप आढळला ! म्हणजे तो येणारा आवाज त्या सापाचा होतो ! रोज साप तेथे येत होता व मी बॅग उघडत होते, पण सापाने मला दंश केला नाही. यात काही दैवी कृपाच असावी असे मला वाटते.'

दैवी कृपा व दृष्टांतावर आणि देवावर अढळ श्रद्धा ठेवणाऱ्या श्री. मानकामे यांचा दुसराही अनुभव ऐकण्यासारखा आहे.

'मला रोज हात स्वच्छ साबणाने धुण्याची सवय. दिवसातून दहा वेळा मी हात धुतो. एकदा जंगलातील निवासांत जेवण झाल्यावर कसे कोणास ठाऊक, पण मी हात साबणाने धुवायचे विसरलो. आमच्या हाताखालचा नोकर हात धुण्यासाठी मोरीत गेला व धावतच घाबऱ्या घाबऱ्या चेहऱ्याने बाहेर आला. तो उद्गारला,

'साहेब ! आपण आज थोडक्यांत बचावलात ! साबणाच्या पेटीला विळखा घालून एक अत्यंत विषारी काळा साप बसला आहे. आपण साबण घ्यायला गेला असतात तर त्याने नक्कीच आपल्याला डंख मारला असता !' तो काळा काटकीसारखा विषारी साप चावला तर माणूस २ मिनिटांच्यावर जगत नाही. सापाची वार्ता पसरताच आजूबाजूचे लोक येऊन त्यांनी त्या जहरी सापाचा चेंदामेंदा केला.'

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अशाच एका प्रसंगी केवळ दैवयोगाने श्री. मानकामे वाघाच्या तडाख्यातून बचावले आहेत. ते म्हणाले–

'जंगलातून आम्ही तीन-चारजण चाललो होतो एकाएकी २०–३० फुटावर एक वाघ आडवा आला ! आमच्या तोंडून शब्दही फुटेना. भीतीमुळे घाम फुटला ! वाघ आमच्याकडे रोखून पहात होता व आम्ही त्याच्याकडे. पाचदहा मिनिटे तो आम्हाला आजमावून पहात होता.एकाएकी त्याच्या मनात काय आले कोण जाणे ! आमच्यावर हल्ला न करता त्याने सरळ बाजूच्या झाडीत झेप घेतली व तो अदृश्य झाला. जिवावरचा हा प्रसंग केवळ सुदैवाने टळला.'

एके दिवशी जंगलातील जाळीत वाघाचे पिल्लू श्री. मानकामे यांस सापडले होते. कुत्रा समजून त्याला पकडण्यात आले. पुढे तो वाघ आहे. हे कळूनही त्याला मानकामेंनी वाढविले. हा 'राजा' वाघ हल्ली बोरीवलीच्या राष्ट्रीय उद्यानात ठेवला आहे. अनेक वर्षानंतरही मानकामे यांना त्या वाघाने बरोबर ओळखले. वाघ त्यांचा हात प्रेमाने चाटू लागला, हे पाहून त्यांना धोक्याचा इशारा देणारे सहकारी थक्क झाले ! पण श्री. मानकामे यांना वाघाच्या स्मरण शक्तीवर पूर्ण भरवंसा होता.

श्री. मानकामे यांचे जंगलातील विविध अनुभव ऐकताना आम्हाला स्थळकाळाचे भान उरले नाही, तरी मुंबईला रात्रीपर्यंत परतणे आवश्यकच होते. त्यांचा मनःपूर्वक निरोप घेऊन शेवटी आम्ही उठलो. मनोर, घोडबंदरमार्गे परतीचा प्रवास करून रात्री आमच्या गाड्या मुंबईला परत आल्या.

श्री. घार्गळकरांनी मला त्यांनी कोठून तरी पैदा केलेले 'सिट्रोनेला' गवताचे सुगंधी तेल भेटीदाखल दिले आहे. त्या सुगंधाइतकीच आमच्या या वाडा–जव्हार सहलीची आठवण माझ्या मनात ठसली आहे. प्रत्येक वेळी त्या सुगंधाचा वापर करताना ती प्लँट नर्सरी, श्री. व सौ. मानकामे यांचे आदरातिथ्य, चांदण्यातला फेरफटका, जव्हारचा शांत-रम्य परिसर यांची आठवण होते. हा सुगंध काही दिवसांत संपून जाईल, पण या प्रवासातील आठवणी आमच्या मनातून कधी जातील असे वाटत नाही !

वृत्तविशेष

घारापुरी सहल आणि मुंबई बंदरात जल-विहाराची सोय

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने १५ नोव्हेंबर १९७५ पासून घारापुरी लेण्यांची सहल व मुंबई बंदरात जलविहाराची सोय सुरू केली आहे.

घारापुरीची सहल रोज सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत असून शनिवार–रविवारी शिवाय दुपारी २०–३० ते सायंकाळी ६–३० पर्यंत जादा सहल आहे. सोबत गाईड असतोच. दर: माणशी रु. १५ व लहान मुलास रु. ७-५० आहे.

मुंबई बंदरात जलविहार रोज दुपारी दोन वाजल्यापासून रात्री बारापर्यंत प्रत्येकी आर्ध्या तासाचा आहे. दर रु. २ व लहान मुलास रु. १ असून रविवार व सुटीच्या दिवशी तो रु. ३ व रु. २ आहे. या सफरी गेट वे ऑफ इंडियापासून निघत असून तेथेच व्हिक्टरी स्टॉल जवळ तिकीट ऑफिस आहे.

इंडियन एअरलाइन्स मुंबई-औरंगाबाद-जयपूर दिल्ली विमान वाहतूक

दिनांक १ नोव्हेंबर १९७५ पासून वरील मार्गावर बोईंग ७३७ ची वाहतूक इंडियन एअरलाईन्सने सुरू केली आहे. अजंठा–एलोरा पाहण्यास उत्सुक प्रवाशांची त्याने फारच सोय होणार आहे.

फ्लाईट नं. आय. सी. ४९२ मुंबईहून सकाळी ६ वा. निघून औरंगाबादला ६-४० वा. पोहोचेल. तेथून ७–१० वा. सुटून जयपूरला ८–२५ वा. पोहोचेल. तेथून ८–५५ वा सुटून दिल्लीस ९–३० वा. पोहोचेल.

फ्लाईट नं आय्. सी. ४९१ दिल्लीहून सकाळी ६ वा निघून जयपूरला ६–३५ वा. पोहोचेल. तेथून ७–०५ वा. सुटून औरंगाबाद येथे ८–२० वा. येईल, येथून ८–५० वा. सुटून मुंबईस ९–३० वा. पोहोचेल.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

कुलाबा जिल्ह्यातील प्रेक्षणीय स्थळे

लेखांक ८

उरण व करंजा

रमेश द. पाटील

मुंबईपासून केवळ सात मैलांवर असलेले मोरा बंदर (उरण पेठा) हे कुलाबा जिल्ह्यातील एक मुख्य बंदर आहे. या बंदरापासून केवळ चार मैलांवरच उरणगाव आहे.

मुंबईपासून सर्वांत नजीक असे हे कुलाबा जिल्ह्यातील स्थान. त्यामुळे इथला मुंबईचा संपर्क निकटचा आहे. त्यामुळे येथे उरण ते मुंबई, उरण-करंजा ते रेवस, उरण पनवेल अशी तिन्ही बाजूंनी प्रवासी वाहतूक चालू असते. येथून पनवेल फक्त अठरा मैल आहे, तर उरण ते करंजा चार मैल व तेथून १।। मैल रेवस खाडी म्हणजेच रेवस फक्त साडेपाच मैलांवर आहे. इथला विलोभनीय समुद्र-किनारा पर्यटकांचे लक्ष वेधून घेतो. न्यारं सृष्टिसौंदर्य या भागाला आहे.

उरणचा इतिहास

कुलाबा जिल्ह्यातील प्रत्येक स्थानाला प्राचीन व ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. उरणचा इतिहास तेच सांगतो.

उरण बेट पेशव्याच्या ताब्यात होते. ते सन १७७४ मध्ये इंग्रज सरदार केटींग याने राघोबा पेशव्यांकडून जिंकून घेतले. आपणास अगदी अलीकडच्या काळात पोर्तुगिजांनी बांधलेल्या किल्ल्याचे भग्न अवशेष दिसतात. या किल्ल्याचे चार कोपरे मात्र अजूनही ओळखू येतात. या किल्ल्याच्या भिंती चौदा फूट रुंदीच्या होत्या, व त्या भिंतींची उंची पंधरा ते वीस फूट एवढी होती. उत्तर-दक्षिणेस या भिंती ३०० यार्ड लांब होत्या व पूर्व पश्चिमेस २०० यार्ड लांब होत्या. हा किल्ला डिसोझा याने फोडून त्याचे दगड तेथील सुप्रसिद्ध भिमला तळ्यास वापरले आहेत. आपण शहरात फेरफटका मारण्याआधी येथे यायचे कसे ते पाहू.

मार्ग

मुंबईहून उरणला येण्यासाठी दोन मार्ग आहेत.

मुंबई येथील चमारगोदी येथून उरणला जाण्यासाठी सकाळी सहापासून सायंकाळी ६ पर्यंत अर्ध्या-अर्ध्या तासाच्या अंतराने लाँचेस (मोटरबोटस्) सुटतात. हे जलवाहतुकीचे एकूण अंतर ७ मैल आहे, व त्याकरिता माणशी १।। रुपया भाडे आहे. या प्रवासास वेळ फक्त अर्धा तास लागतो. आवश्यकता वाटल्यास आधी आठ दिवस तिकिटे काढून ठेवता येतात, किंवा जास्त लोक असल्यास स्पेशल लाँचही रिझर्व करता येते.

लाँच मोरा बंदराला लागल्यानंतर धक्का बराच लांब अंतरापर्यंत पसरलेला आहे, तो पार करावा लागतो.

येथून उरणला जाण्यासाठी एस. टी. बस मिळू शकते, किंवा टांगेही आहेत. मोरा बंदराला लागूनच हिंदुस्थानातील एकमेव असा 'ग्राईंडवेल' कंपनीचा भव्य कारखाना दृष्टीस पडतो.

येथून उरणगाव फक्त चार मैलांवर आहे. मोरा बंदरानजीक कोळी लोकांची वस्ती आहे. एवढी मोठी वर्दळ असूनही येथील रस्ते पाहिजेत तसे व्यवस्थित नाहीत. पावसाळ्यात तर फार हाल होतात. ही इथल्या लोकांची जुनी व्यथा आहे.

उरण गावात

मोऱ्याहून आपण उरणला येतो. गाव अगदी भरगच्च भरलेलं दिसतं. उरणचे क्षेत्रफळ आठ स्क्वेअर मैल एवढं आहे. इथल्या म्युनिसिपालटीची स्थापना १८७८ साली झाली. त्यामुळेच जनतेच्या सोईच्या बऱ्याचशा योजना मूर्त स्वरूपात आलेल्या दिसतील.

उरण गावात जिल्हा परिषदेची शाळा आहे, जनरल एज्युकेशन संस्थेचे हायस्कूल आहे, गोपाळ कृष्ण ग्रंथालय आहे.

उरणचे कस्टम हाऊस फार मोठे आहे. उरणचे बंदर मोरा हे उत्तरेला तीन मैलपर्यंत पसरले आहे.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

उरणमध्ये मार्केट आहे; व मार्केटच्या आसपास बाजारपेठेत दोन-तीन बऱ्यापैकी खानावळी व हॉटेल्स आहेत. प्रवासी अतिथिगृह, समाधान लॉज यासारखी सर्वसामान्यांना परवडतील अशी उतरण्याजोगी लॉजेस आहेत.

मार्केटजवळ रोमन कॅथॉलिक चर्च आहेत. तसेच गावात संगमेश्वर महादेवाचे दगडी बांधकामाचे देऊळ आहे. हे देऊळ सर सुभेदार रामजी महादेव याने १७६० ते १७७२ च्या सुमारास बांधले. विठोबा–रखुमाई, व्यंकटेश बाळाजी, मारुती, गणपती, लक्ष्मी-नारायण मंदिर, द्रोणागिरी व शितलादेवी इत्यादी प्राचीन मंदिरे इथे आहेत.

इथलं सर्वांत मोठं तळे सन १८३० मध्ये बांधलं गेलं. हे तळे खोदताना काही विशिष्ट दगड मिळाला. या तळ्याचे बांधकाम भीम राजानं केलं. त्यामुळे या तळ्याला भिमला तळे असे म्हणतात.

भिवंडीवाला गार्डन

भिमला वॉटर रिझर्वॉयर जवळ सदरहू बाग आहे. या बागेची देखभाल येथील ट्रस्टी पाहतात. या बागेत आंब्याची, नारळी–पोफळीची हजारो झाडे आहेत. ही बाग सकाळी ६–३० ते सायंकाळी ६–३० पर्यंत सर्वांना खुली असते. तसेच या बागेत येथील ट्रस्टींनी एक बंगला मुद्दाम प्रवाशांकरिता वापरण्यासाठी ठेवला आहे. तेथील ट्रस्टींना आपण आधी कळविल्यास सदरहू बंगला वापरावयास मिळतो. सुट्टीच्या दिवसांत या बागेचे एक आकर्षण हौशी पर्यटकांना आहे.

आठवड्याच्या सुट्टीत येणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांकरिता ७०'×४०' ची एक भव्य शेड बांधली आहे. शेडच्या आतील बाजूस आकर्षक मार्बल फ्लोरिंग केले आहे. विजेची सोय आहे. पंखे आहेत. या उपयुक्त सोई केवळ हौशी प्रवाशांना आराम लाभावा याचसाठी आहेत.

करंजा

उरणपासून केवळ चार मैलांवर करंजा हे बंदर आहे. येथून रेवस बंदराकरिता तर (इंजिन पडाव) सुटते. ही खाडी करंजा ते रेवस केवळ १।। मैलच अंतराची आहे. अलिबाग तालुका अशा रीतीने उरणला निकटचा झाला आहे.

करंजा गाव आठ मैल लांब व चार मैल रुंद असे पसरले आहे. गाव फार टुमदार आहे. रचना सुंदर आहे. वस्ती बहुतेक कोळी लोकांची आहे. इथला समुद्रकिनारा इतका प्रेक्षणीय आहे की थोडा वेळ जरी आपण वाळूत उभे राहिलो तरी मन प्रसन्न होते. पिकनिक स्पॉट म्हणून या स्थानाला महत्त्व आहेच, परंतु अनेक चित्रपट निर्मात्यांनी आपल्या हिंदी–मराठी चित्रपटांचे बाह्यचित्रीकरण इथल्या रम्य परिसरात केले आहे.

करंज्याचा बंदरपट्टीचा पूर्व–पश्चिम हा पट्टा मुंबईपासून केवळ सहा मैलांवर आहे. मात्र पूर्वेकडून भेंडखळ खिडीतून हा भाग वेगळा केला आहे.

बुद्धलेणी

उरणच्या पूर्वभागात खरवली (खारपुते) या टेकडीच्या परिसरात काही बुद्ध लेणी सापडली आहेत. तीन शिलालेखही उत्खननात सापडले आहेत. साधारणतः ही लेणी बाराव्या शतकातील असावीत.

त्या आधारे सदरहू बेटात त्या काळात येथे बाग आणि छोटी खेडी होतीं असे अनुमान निघते.

या बेटाचा पूर्वइतिहास मजेचा आहे. १५३० ते १७४० या काळात हे बेट पोर्तुगिजांच्या अधिपत्याखाली होते.

बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
पुणे
डेक्कन जिमखाना, ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठीं
खास नवीन प्रकार

खास नवीन प्रकार

प्रवासासाठी

सुंदर रंगात

उबदार फ्लॅनेल

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

सोळाव्या शतकात आजूबाजूच्या परिसरात हे अत्यंत प्रसिद्ध बेट होते.

या करंजा बेटावर दोन किल्ले होते. एक किल्ला-पूर्वेस जिथे सध्या उरण शहर वसले आहे तिथे–होता व दुसरा किल्ला दक्षिणेस डंचावरील खडकावर होता. १६८२ मध्ये करंजा हे बेट पोर्तुगिजांपासून संभाजीने घेतले. त्यानंतर जवळ जवळ एक वर्षभर ते त्यांच्या ताब्यात होते. नंतर पुढे वर्षभराने पोर्तुगिजांनी संभाजीपासून पुन्हा ते मिळवले.

द्रोणागिरी

हा डोंगर उरणपासून करंजापर्यंत किनारपट्टीनं आडवाच्या आडवा पसरलेला आहे. याबाबतची दंतकथा अशी की, राम-रावण युद्धात लक्ष्मण रणांगणावर आसन्न मरण स्थितीत यातना भोगीत पडला असताना विशिष्ट पर्वतावरील एक दिव्य वनस्पती आवश्यक होती–तोच हा द्रोणागिरी पर्वत होय.

या द्रोणागिरी पर्वताच्या माथ्यावर बुद्ध काळातील सुंदर कोरीव लेणी खोदलेली दृष्टीस पडतात.

येथूनच जरा पूर्वेस पोर्तुगिजांनी बांधलेला भव्य किल्ला, गार्ड हाऊस, नॉट्री सिन्होरा चर्च हे दिसते.

पूर्वेच्या बाजूस असलेल्या दक्षिण टेकडीस खरवली किंवा खारापुसे येथे लहानशा कपारीत लेणी खोदलेली आहेत. ही लेणी बुद्ध काळातीलच आहेत. लेणी रेखीव व कलात्मक आहेत २५'×२०'×१०' अशी ही खोदून तयार केलेली कलात्मक घळ आहे. डोंगरावर जाण्यासाठी पायवाट अवघड आहे. माहीतगार वाटाड्या घेतल्याशिवाय तेथे आसमंतात फिरणे योग्य नाही. या कलात्मक घळीच्या डाव्या बाजूसही सुंदर कलाकृती खोदल्या आहेत. लेण्याच्या दर्शनीचा भाग दोन चौकोनी खांबांनी समोर तोलून धरला आहे. हे सर्व पहात असताना खेद इतकाच होतो की, शासनाचे या भागाकडे सर्वच दृष्टीने दुर्लक्ष आहे. मला तर अशी भीती वाटते की, काही दिवसांनी ही लेणी, ते अवशेष कालौघात विरून जातील.

शासनाकडून अपेक्षा

तरी माझी महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाला नम्र विनंती आहे की, पूर्वजांचा हा कलात्मक वारसा जपून ठेवण्यासाठी त्यांनी व्यवस्था केली पाहिजे. ही लेणी शोधून पर्यटकांना तिथे येण्यासाठी आकर्षक अशा सोई निर्माण केल्या पाहिजेत.

तसेच महाराष्ट्र शासनाने कुलाबा जिल्ह्यातील मुरूडला जसा हॉलिडे कॅम्प बांधला आहे तशी येथे, विशषत: करंजा येथे समुद्रकिनारी छोटी घरे (बांबूची घरे) बांधावीत. पिण्याच्या पाण्याची सोय करावी. जेवणासाठी भांडी उपलब्ध करून द्यावीत. मला वाटतं, मुंबईपासून अगदी जवळचे असे हे आराम स्थळ बनवता येईल. महाराष्ट्र शासनाने हौशी पर्यटकांच्या अशा सोई तिथे केल्यास मुंबईच्या निर्मात्यांना बाहचचित्रणासाठी तिथे येणे सुलभ होईल. सरकारने वाटल्यास त्याकरिता काही जादा आकार घ्यावा, व पर्यटकांचा व कलावंताचा दुवा घ्यावा.

प्रसिद्ध झाल्या....तीन बहूमोली डायऱ्या

प्रवासी डायरी १९७६ : मूल्य सहा रुपये

महाराष्ट्रातील स्थळांचा मार्गदर्शक, लॉजिंग यादी, रेल्वे, एस्. टी वेळापत्रकासह.

TOURIST DIARY 1976 Price 6–50

इंग्रजी मधून अखिल भारतीय स्थळांची राज्यवार माहिती लॉजिंग यादी, रेल्वे वेळापत्रकासह.

गृहिणी डायरी १९७६ मूल्य रू. ५-५०

गृहिणींच्या जिव्हाळ्याचे सर्व विषय, घरगुती औषधे, सण, व्रते, आरत्यांसह.

तीनही डायऱ्यांना आकर्षक प्लॅस्टिक कव्हर. पोस्टेज प्रत्येकी तीन रुपये

म. ऑ. पाठवा अथवा व्ही. पी. ने. मागवा.

दीपा पब्लिकेशन्स.

७९७, (नवा) सदाशिव पेठ, बॅ. गाडगीळ स्ट्रीट, पुणें ३०.

(४११ ०३०)

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

महाराष्ट्र भ्रमण

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने आयोजित केलेल्या सोयिस्कर आणि आरामशीर सहलींमध्ये सहभागी होऊन विविध प्रेक्षणीय स्थळांना भेटी द्या. इतरांपेक्षा आम्ही आपल्याला महाराष्ट्राचे यथार्थ दर्शन घडव आपल्या पसंतीप्रमाणे कोणतीही सहल निवडा :–

मुंबईहून निघणाऱ्या सहली

मुंबई शहर–दर्शन (सोमवार खेरीज सर्व वारी)
मुंबई परिसर (रविवार आणि सुट्टीच्या दिवशी)
धारापुरी लेणी (दररोज)
मुंबई बंदर जलविहार (दररोज)
अजिंठा वेरुळ–तीन दिवस (दर शुक्रवारी)
गोवा–पाच दिवस.
महाबळेश्वर, प्रतापगड–तीन दिवस.

पुण्याहून निघणाऱ्या सहली

अजिंठा, वेरुळ शनिवारी–रविवारी
गोवा–चार दिवस
महाबळेश्वर–एक दिवस.
कार्ला, लोणावळा, खंडाळा–एक दिवस.
शिर्डी एक दिवस.

नागपूरहून निघणाऱ्या सहली

अजिंठा–वेरुळ–तीन दिवस.
चिखलदरा–दोन दिवस.
रामटेक–एक दिवस.
सेवाग्राम–एक दिवस.
नगपूर दर्शन–एक दिवस.

गटांनी येणाऱ्यांसाठी विशेष गट सहली : मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, पणजी या ठिकाणाहून आयोजित केल्या जातात.

दर व इतर तपशिलासाठी खालील कार्यालयाशी संपर्क साधा.

प्रमुख कार्यालय :

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ
एक्सप्रेस टॉवर्स, ९ वा मजला,
नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.

प्रादेशिक कार्यालये :

१) सेन्ट्रल बिल्डिंग्ज्, पुणे ४११ ००१.
२) विभागीय आयुक्तांचे कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर.
३) हॉलिडे कँप, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००१.
४) टूरिस्ट होस्टेल, पणजी, गोवा.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri